आकाशवाणी नागपूर

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर २०२५

ठळक बातम्या

- नॅरोगेज नागपूर-नागभीड मार्गाच्या ब्रॉडगेज मधील रुपांतरणासाठी सुमारे ४९१ कोटी रुपये खर्चाच्या तरतुदीस राज्य मंत्रिमंडळाची मान्यता.
- महाराष्ट्रात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई मिळेल अशी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची ग्वाही.
- राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या सहा शास्त्रज्ञांना प्रतिष्ठित स्टॅनफर्ड-एल्सेव्हिअर ग्लोबल डेटाबेस मध्ये स्थान.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत 71व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं वितरण / अभिनेता मोहनलाल दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित.

मंत्रिमंडळ निर्णय

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुंबईत पार पडली. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून-

*१९६ पूर्णांक १५कि.मी.नॅरोगेज नागपूर-नागभीड मार्गाचे ब्रॉडगेज मधील रुपांतरणाच्या कामासाठी ४९१ कोटी ५ लाख रुपये खर्चाच्या तरतुदीस या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अकोल्यात शहर बस स्थानक, भाजी बाजार आणि वाणिज्य संकुलासाठी मौजे अकोला येथील २४ हजार ५७९ पूर्णांक ८२ चौरस मीटर जागा महापालिकेला हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय अन्य निर्णयात शासकीय रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी, तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटीला राखीव निधी देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला आहे. राज्यामध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली इथल्या जिल्हास्तरीय 'गट-क' आणि 'गट-ड' मधील पदं सरळसेवेने भरतीसाठी सुधारीत आरक्षण विहित करण्यात आलं आहे. (आकाशवाणी वृत्त विभागातून मी हेमांगी कुळकर्णी)*

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

राज्यात अतिवृष्टीमुळे ७० लाख एकर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान झाल्याचा अंदाज असल्याचं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. शेती, पशुधनासह ग्रामीण भागात रस्ते आणि घरांचं अतोनात नुकसान झालं असून, युद्धपातळीवर बचाव आणि मदतकार्य सुरू असल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

*माझ्या शेतकरी बांधवांना यानिमित्ताने मी एवढं सांगू इच्छितो कि या संकटाच्या काळी, अडचणीच्या काळी हे शासन तुमच्या सगळ्यांच्या पाठीमागे आहे ज्यांचे ज्यांचे नुकसान भरपाई झालेली आहे पंचनामे पूर्ण झाले आहेत त्यांना नुकसान भरपाई दिलेली आहे. अजूनही ज्यांची नुकसान भरपाई देण्याचे राहिलेले आहे हि संपूर्ण नुकसान भरपाई दिवाळीच्या अगोदर माझ्या सगळ्या शेतकरी बांधवांना दिली जाईल.*

विजय वडेट्टीवार

दरम्यान, राज्यात गेल्या काही दिवसात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती उद्‌भवली असून अनेक ठिकाणी पिकांचं नुकसान झालं आहे. पशुधन वाहून घेलं असून घरांचही नुकसान झालं असल्यानं राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

*मराठवाडा जवळजवळ संपला आहे विदर्भातील पाच-सहा जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच प्रचंड नुकसान झालेल आहे. आता एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे ते जुने निकष आहे तोच लागू करून ही साडेआठ हजार रुपये प्रति हेक्टरप्रमाणे सोळा - सतरा हजार रुपयात काय होणार आहे आणि अशा स्थितीमध्ये तुम्ही ओला दुष्काळ जाहीर करणं हेच महत्त्वाचं होतं आणि ओला दुष्काळ जाहीर करून तुम्हाला भरीव किमान ५० हजार रुपये पर हेक्टरी मदत दिली तरच शेतकरी वाचेल.*

डफडे मोर्चा

यासोबतच शेतकऱ्यांना खोटी आश्वासने देऊन सत्तेत बसलेल्या महायुती सरकारनं आतातरी अतिवृष्टी आणि पुरामुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, कर्जमाफीचं आश्वासन पूर्ण करावं अशी मागणी करीत

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं यवतमाळमध्ये डफडे वाजवा आंदोलन केलं.

<u>सेवा पर्व-असंघटीत क्षेत्रातील कामगार</u>

सेवा आणि सुशासन या सूत्राला केंद्रस्थानी ठेवून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशाच्या परिवर्तन आणि प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. सेवापर्व निमित्त सुरू केलेल्या विशेष मालिकेच्या आजच्या भागात, सरकारने असंघटीत क्षेत्रातील कामगार आणि घटकांसाठी राबविलेल्या कल्याणकारी उपाययोजना, सामाजिक सुरक्षा उपक्रम आणि आर्थिक समावेशनाच्या प्रयत्नांविषयी सविस्तर जाणून घेऊ.

<u>*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना संबोधित करताना म्हटलं होतं - जर तुमच्याकडे तारण ठेवण्यासाठी काही नसेल, तर काळजी करण्याचं कारण नाही. कारण मोदी हीच तुमची हमी आहे.”*</u>

<u>*जिनके पास गारंटी देने के लिए कुछ नहीं था तो मोदी ने कह दिया था बैंकों से भी और रेड़ी-पटरी वाले भाई बहन को भी अगर आपके पास गारंटी देने के लिए कुछ नहीं है तो चिंता मत कीजिए, मोदी आपकी गारंटी लेता है।*</u>

<u>*(सकल राष्ट्रीय उत्पादनात ४५ टक्के योगदान असलेले असंघटीत क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत एक महत्त्वाचा घटक आहे. सरकारनं असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सक्षमीकरणाची जबाबदारी घेतली आहे. सरकारच्या विविध उपक्रमांमुळे कामगारांना लाभ, कर्ज आणि प्रशिक्षणाची हमी मिळते आहे.” प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन, ई-श्रम पोर्टल आणि अटल पेन्शन योजना यामधून सामाजिक सुरक्षा आणि वृद्धापकाळात आर्थिक आधार दिला जातो. पीएम स्वनिधी योजनेद्वारे छोट्या व्यवसायिकांना भांडवलाची सुविधा मिळते, तर प्रधानमंत्री जनधन योजनेनं बँकिंग सेवांचा समावेश वाढवला. या उपाययोजनांमुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांचं सक्षमीकरण, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक संरक्षण बळकट झालं*</u> *आहे.*

सीएसआयआर-नीरी

सीएसआयआर-नीरीने संशोधनाच्या क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे- याबाबत सांगत आहेत आमच्या प्रतिनिधी हेमांगी-

*प्रतिष्ठित अशा स्टॅनफर्ड-एल्सेव्हिअर ग्लोबल डेटाबेस ऑफ टॉप- साइटेड सायंटिस्ट्स 2025 मध्ये सीएसआयआर राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था- नीरी इथल्या सहा शास्त्रज्ञांना स्थान मिळालं आहे. डॉ.पी.व्ही. निधीश, डॉ.सुनील कुमार, डॉ.अमित बाफना, डॉ.आशा जुवारकर, डॉ.तनवीर आरफिन तसच सीएसआयआर-नीरीचे संचालक डॉ.एस. वेंकट मोहन, यांचा या यादीत समावेश आहे. ही रँकिंग स्कोपसच्या आकडेवारीवर आधारित असून, त्यात संशोधनातील संदर्भांची संख्या आणि लेखनातील योगदान अशा निकषांचा विचार करण्यात आला आहे.*

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्लीत **71**वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान केले. मल्याळी चित्रपट अभिनेता मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार शाहरुख खान यांना जवान या चित्रपटासाठी तर विक्रांत मस्सी यांना **12**वीं फेल या चित्रपटासाठी प्रदान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार राणी मुखर्जी यांना मिसेस चटर्जी वर्सेस नॉर्वे या चित्रपटासाठी प्राप्त झाला. सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा पुरस्कार **12**वीं फेल या चित्रपटाला मिळाला आहे.सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार द केरला स्टोरी साठी सुदीप्तो सेन यांना तर रॉकी और रानी की प्रेम कहानी ला सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कारांमध्ये साने गुरुजी यांच्या साहित्यावर आधारित 'श्यामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार मिळाला आहे. तर 'नाळ २' या चित्रपटानं सर्वोत्कृष्ट बालचित्रपट पुरस्कार पटकावलाय.

ऑनलाईन गेम्स

देशातील तरुण पिढीला ऑनलाईन गेम्सच्या विळख्यातून वाचवण्यासाठी केंद्र सरकारने संमत केलेल्या प्रमोशन ॲण्ड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग ॲक्ट **2025** या कायद्याचे अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने समर्थन केलं असून, या कायद्याच्या विरोधात दाखल झालेल्या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळाव्यात, यासाठी केंद्र शासनाने आपली बाजू न्यायालयात सशक्तपणे मांडावी,

अशी मागणी ग्राहक पंचायतीच्या राष्ट्रीय कार्यकारी परिषदेत करण्यात आली. नागपूर इथल्या रेशीमबाग स्मृतिमंदिर नुकत्याच पार पडलेल्या या राष्ट्रीय परिषदेत ऑनलाईन गेम्स संदर्भातील प्रस्ताव सर्वसंमतीने संमत करण्यात आला. देशभरातील **38** प्रांतांतील **250** हून अधिक प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते.

<u>हवामान</u>

येत्या काही तासात चंद्रपूर जिल्हयामध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच गडचिरोली, यवतमाळ, वाशीम, नागपूर या जिल्हयांमध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****